-69- ४८३

राजपत्रित वर्ग-१ व वर्ग-२ च्या
अधिका-यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल
आगाऊ वेतनवाढी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक आवेवा-१०८९/४४/प्र.क्र.१३/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ नोव्हेंबर १९९०.

पहा:- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७७/सीएन-१२७/७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर १९७९.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८५/१६१४/प्र.क्र. २५७/आठ, दिनांक ८ एप्रिल १९८६.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८६/प्र.क्र. १४१/आठ, दिनांक १४ ऑक्टोबर १९८८.

[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आवेवा-१०८९/४४/प्र.क्र. १३/आठ, दिनांक २ जून १९९०.

शासन निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आवेवा-१०८९/[४४]/प्र.क्र. १३/आठ, दिनांक २ जून १९९० च्या आदेशातील परिच्छेद २ अनुसार रुपये ५०००/- या उच्चतम टप्प्यापर्यन्तच्या वेतनश्रेणीतील वेतन घेणा-या वर्ग-१ च्या अधिका-यांना आगाऊ वेतनवाढींच्या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या अधिका-यांचे प्रस्ताव आस्थापना मंडळ क्र.२ तपासेल व आपल्या शिफारशी मुख्य सचिवांना सादर करेल असे ठरविण्यात आले. या आदेशात किरकोळ फेरफार करुन शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

[एक] ज्यांच्या वेतनश्रेणीचा उच्चतम टप्पा रु.४६२५/- पेक्षा जास्त नाही अशा वर्ग-१ च्या अधिका-यांच्या बाबतीतील प्रस्तावांवर सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०८५/१६१४/प्र.क्र. २५७/आठ, दिनांक ८ एप्रिल १९८६ मधील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या संबंधित विभागातील समितीकडून कार्यवाही करण्यात येईल.

[दोन] अन्य वर्ग १ च्या अधिका-यांसंबंधीच्या [ज्यांच्या वेतनश्रेणीचा उच्चतम टप्पा रु.४६२५/- पेक्षा अधिक, परंतु रु.५०००/- पर्यन्त असेल] प्रस्तावांवर आस्थापना मंडळ क्र.२ कडून कार्यवाही करण्यात येईल व ते मंडळ आपल्या शिफारशी मुख्य सचिवांना सादर करेल.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
ESt
11 JAN 1991

[तीन] वरील [दोन] मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांचे अलीकडेच पाच वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन संबंधित विभागाच्या सचिवांनी पात्र

C४८

अधिका-यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत व त्याचवेळी या अधिका-यांची संवर्ग निहाय संख्या नमूद करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. म. भगगे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति